RNI No. MAHBIL/2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार—क

वर्ष ३, अंक ८(२)] शुक्रवार, फेब्रुवारी ३, २०१७/माघ १४, शके १९३८ [पृष्ठे ५ किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५

**अधिसूचना**

**विद्युत अधिनियम, २००३.**

क्रमांक मविनिआ/तांत्रिक/परवाना अटी/जीईपीएल/२०१७/१४२५.—विद्युत्त अधिनियम, २००३ चे कलम १८१ आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग याद्वारे ' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१५', (' मुख्य विनियम ') या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :—

**१. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ**

(१) या विनियमांना ' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] (पहिली सुधारणा) विनियम, २०१७ ' असे म्हणावे.

(२) हे विनियम **शासकीय राजपत्रात** ज्या दिनांकास प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. मुख्य विनियमांच्या विनियम १(२) मध्ये सुधारणा**

मुख्य विनियमांमधील विनियम १(२) खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की,—

" हे विनियम भारत सरकार, वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय, वाणिज्यिक विभाग (विशेष आर्थिक क्षेत्र कक्ष), यांच्या दिनांक ११ जून २०१३ च्या एसइझेड अधिसूचना क्रमांक एस.ओ. १६९५(ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रासाठी आणि दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ च्या एसइझेड अधिसूचना क्रमांक एस.ओ. ५९५ (ई) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अतिरिक्त क्षेत्रासाठी लागू राहतील. "

३. मुख्य विनियमांच्या विनियम ४.१ मध्ये सुधारणा

मुख्य विनियमांमधील विनियम ४.१ खालीलप्रमाणे बदलण्यात येईल, जसे की,—

" मानीव वितरण परवानाधारकाने विजेचा पुरवठा करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेले वीज पुरवठ्याचे क्षेत्र हे भारत सरकारच्या वाणिज्यिक आणि उद्योग मंत्रालय (वाणिज्यिक विभाग) यांनी, विशेष आर्थिक क्षेत्र अधिनियम, २००५ च्या कलम ४ अंतर्गत निर्गमित केलेल्या एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ. १६९५ (ई), दिनांक ११ जून २०१३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, तसेच त्यानंतरची एसइझेड अधिसूचना क्र. एस.ओ. ५९५(ई), दिनांक १८ फेब्रुवारी २०१५ अन्वये सुधारित केल्यानुसार, प्लॉट क्र. आयटी-५, ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील १२.९१ हेक्टर्सचे संपूर्ण क्षेत्र राहील. हे क्षेत्र सदर अधिसूचनांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अशा अटी आणि वगळण्यात आलेल्या बाबी यांच्या अधीन राहून असेल आणि ते सोबतच्या अनुसूची १ मधील सुधारित नकाशामध्ये अधिक तपशीलासह आरेखित केल्यानुसार राहील. "

अश्वनी कुमार सिन्हा,
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग.

मुंबई,
दिनांक १ फेब्रुवारी २०१७.

---

सूचना.— ' महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [ मे. गिगाप्लेक्स इस्टेट प्रा. लि. च्या ऐरोली नॉलेज पार्क, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, ऐरोली, जिल्हा ठाणे, येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवाविषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी ] विनियम, २०१५' शासकीय राजपत्रात दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजी अधिसूचित करण्यात आले होते.

Schedule - 1

225

| AREA STATEMENT | SQ MTS | ACRES | HECTARES |
|---|---|---|---|
| AREA OF THE PLOT | 2,02,300.00 | 50.00 | 20.23 |
| AREA UNDER SEZ AS PER NOTIFICATION (SHOWN THUS ▨) | 1,17,414.91 | 29.01 | 11.74 |
| ADDITIONAL AREA UNDER SEZ (SHOWN THUS ▩) | 11,739.67 | 2.90 | 1.17 |
| BALANCE PLOT AREA | 73,145.42 | 18.08 | 7.32 |

REGIONAL OFFICER,
M.I.D.C REGIONAL OFFICE
MAHAPE

Sambaprasad Pinge
Architect
Reg. No. CA/90/13213




BLOCK PLAN

N

NOTES:
- BOUNDARIES SHOWN IN BLOCK PLAN ARE BASED ON LAYOUT PLAN APPROVED BY MIDC.
- AREAS ARE SUBJECT TO SURVEY & DEMARCATION ON SITE

GIGAPLEX ESTATE PVT. LTD.
PROPOSED SEZ AT PLOT No. I.T. 5 AT (MIDC) AIROLI KNOWLEDGE PARK, AIROLI.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.